## प्रकरण चौथे

## बळीराजा धरण - एक चळवळ

## प्रकरण चौथे

## बळीराजा धरण - एक चळवळ

### 4·1 धरणाची गरज :-

सांगली जिल्हयाच्या खानापूर तालुक्यातील बलवडी-तांदुळवाडीचे "बळीराजा स्मृती धरण" सन 1986 पासून देशपातळीवर गाजत आहे· या धरणाच्या संदर्भात अनेक प्रकारे चर्चा झालेली आहे, तसेच सध्याही चालू आहे· अशा या धरणाची गरज या परिसरातीलच लोकांना कशासाठी वाटू लागली याचा प्रथम प्रस्तुत प्रबंधिकेच्या निमित्ताने अभ्यास करणे आवश्यक आहे· या धरणाच्या आवश्यकतेची जाणीव करून देणारे काही घटक पुढीलप्रमाणे दिसून येतात·

#### 1· दुष्काळ :-

1972 साली दुष्काळाचं सावटं संपूर्ण देशभर पसरलं· विशेषतः त्याचा जबर तडाखा सांगली जिल्हयातील विटा, खानापूर, जत इत्यादि भागाला बसला· याच काळात हरीत क्रांतीला सुरुवात झाली· शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विजेच्या पंपाचा वापर करून ऊसासारखी नगदी पिके घेऊन आपले राजकीय नेतृत्व प्रस्थापित करण्याची स्पर्धा इथल्या बडया जमीनदारांमध्ये सुरू झाली· लहानमोठया कारखान्यांची निर्मिती झाली· काही जमीनदार रातोरात कारखानदार बनले· पण आभाळाकडे डोळे लावून वरूण राज्याची प्रतिक्षा करणारे छोटे शेतकरी, कष्टकरी यांच्या हातातील अवजारे गळून पडली· पावसाच्या एका-एका थेंबाची वाट पाहता पाहता त्यांच्याच डोळ्यातून अश्रूंचे थेंब पडू लागले· पण रखरखत्या उन्हात करपून निघणारी आतडी ओली करण्यासाठी ते दुःखाश्रू गिळत, पोटाबरोबरच जन्माला घेऊन आलेल्या दोन हाताला काम शोधण्यासाठी तो वणवण भटकू लागला आणि आकस्मिकपणे एखादा चमत्कार घडून यावा असा एक चमत्कार घडला· मायबाप सरकारला या कष्टक-यांची जणू दया आली· रस्त्यावर खडी फोडायचे काम देऊन राबणा-यांच्या हाताला रोजगाराची हमी दिली· येरळेच्या खो-यातून

घनहातोडीचे आवाज घुमू लागले आणि यातूनच कष्टक-यांच्या टाळूवरचे लोणी खाणारा अधिकारी वर्ग जन्माला आला. अल्पमजुरीत भरपूर काम करून घेऊन कष्टक-यांच्या मजूरीतील पैसे लुटायला अधिका-यांची सुरुवात झाली.[1]

मजुरांच्या हजेरी पत्रकावर बोगस मजूरांची नांवे घुसडून मस्टरक्लार्क, ओव्हरसिअर इ. अधिका-यांनी रोजगार हमी योजनेतून अमाप संपत्ती मिळविली. या अधिकारी वर्गाने त्या काळात सुध्दा आपणच हर्षद मेहतांचे पूर्वज आहोत हे कृतीसह दाखवून दिले. अधिका-यांच्या भ्रष्टाचाराला ऊत येवून तो बेताल बनू लागला. पण मुळातच क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या "पत्री सरकारची" व सत्यशोधक चळवळीची परंपरा पाठीशी असणा-या या खानापूर-विटा तालुक्यातील जनता "सत्य" न शोधतील तर नवल. घनहातोडीचे घाव पडता पडता मध्येच त्यांची गती मंद होऊ लागली. कानाला कान लागला. आपापसात कुजबुज सुरु झाली. "चार रुपडयात एवढं राबराब राबायचं, रक्त आणि मांस आटवून रस्ते तयार करायचे आणि या रस्त्यावरुन जाणार कोण ? तर बागायतदार आणि कारखानदारांच्या मोटारी या रस्त्यावरून उडविल्या जातील. मग आमचं काय ? आणि मग पगारवाढीसाठी सरकार बरोबर लढा देण्याचा निर्णय झाला. कष्टकरी विरुध्द सरकार अशी संघर्षाची पहिली नांदी येरळेच्या खो-यात निनादली. कधी जय तर कधी पराजय झेलत ही कष्टकरी जनता आपल्या न्याय हक्कांसाठी झुंज देत राहिली. वर्षा-मागून वर्षे उलटू लागली[2] परंतु येथील नैसर्गिक परिस्थितीही बदलली नाही उलट वर्षामागून वर्षे दुष्काळाची जावू लागली. "नेमिच येतो मग दुष्काळ" अशी परिस्थिती येथे कायमची निर्माण झाली. शासनानेही दुष्काळ निर्मूलनासाठी कायमस्वरूपी योजना राबविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे येथील जनता दुष्काळाच्या दाहकतेमुळे होरपळून निघाली. जगायचे असेल तर आपणच यातून मार्ग काढला पाहिजे. शासनाबरोबर लढे देवून दुष्काळी परिस्थिती हटणार नाही आणि शासनही ती हटविण्यास उत्सुक नाही. म्हणून स्वतःच दुष्काळ निर्मूलनाचा मार्ग हाती घेण्याचा विचार दुष्काळग्रस्त जनता करु लागली.

## 2. मुंबई गिरणी कामगारांचा सन 1982 चा संप :-

खानापूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे बहुतांश लोक उदर-निवार्हासाठी मुंबईला स्थलांतरित झाले होते. त्यापैकी बहुतांश मंडळी कापड गिरणीमध्ये

काम करीत होती. परंतु 1982-83 साली मुंबई गिरणी कामगारांचा संप झाला. अन्न-वस्त्राला महाग झालेला मुंबईतील गिरणी कामगार आपल्या जन्मगावी परतू लागला. गावाकडे आधीच दुष्काळाने पिचून निघालेल्या कष्टक-यांच्या दुःखात गिरणी कामगारांच्या संपाने आणखी भर पडली. खेडयातील बेरोजगारीत अधिक भर पडली.[3] लोकांना जीवन जगणे कठीण झाले. दुष्काळाने निर्माण झालेले : रोजगार, चारा, पाणी, अन्नधान्य हे गंभीर प्रश्न सोडविण्यास शासन असमर्थ ठरले. दुष्काळावर कायमस्वरूपी उपाय न शोधता केवळ मलमपट्टीसारखे उपाय करून सर्वसामान्य जनतेला काहीतरी केले आहे असा भास निर्माण करून दिला जात होता. गरीब बिचारा अशिक्षित, अंधश्रध्दाळू शेतकरी हे दिवसेंदिवस घाण्याच्या बैलाप्रमाणे सहन करीत होता. पण परिस्थिती बदलत नाही, शेतीव्यवसाय दिवसेंदिवस तोटयात चालून डोक्यावर शेतीकर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे येथील शेतकरी कुटुंबे पूर्ण उद्ध्वस्त झालेली होती. ही परिस्थिती बदलविण्यासाठी दुष्काळावर आपणच उपाय शोधला पाहिजे हा विचार येथील कष्टक-यांच्या मनात ब-याच वर्षापासून रुजला होता. या विचाराला खतपाणी देण्याचे काम मुंबईच्या संपाने बेकार होऊन गावाकडे आलेल्या कामगारांनी केले.

3. <u>वाळू</u> :-

बळीराजा धरणाच्या निर्मितीला येरळेची वाळू हे महत्त्वाचे कारण आहे. बलवडी व तांदुळवाडी गावांच्या सीमाहद्दीतून येरळा नदी वाहत आहे. "पूर्वी" या नदीला बारमाही पाणी असायचे. "येरळेचा अंत लागायचा नाही" असे लोक म्हणायचे. पण वर्षामागून वर्षे दुष्काळाची गेली आणि येरळेचा अंत लागायला सुरूवात झाली. अंत लागता लागता नदी कोरडी पडायला सुरूवात झाली. 1980-81 सालापासून पावसाळ्यात पाऊस ब-यापैकी पडला तर तेवढयापुरता पूर येतो. 10-15 दिवस पाणी रहाते आणि पुन्हा पात्र कोरडे ठणठणीत अशी अवस्था सुरू झाली.[3] येरळेचे कोरडे पात्र येथील जनतेला शाप ठरले तरी ते सरकारी अधिकारी आणि वाळू कंत्राटदार यांना मात्र वरदान ठरले.

येरळेच्या वाळूमध्ये रेती व मातीचा अंश कमी असल्यामुळे बांधकामासाठी तिचा चांगला उपयोग होतो. वाळू विक्रीतले इंगीत माहित असणा-या काही पैसेवाल्यांच्या

तोंडाला येरळेच्या कोरडया पात्रातील वाळूमुळे पाणी सुटले· शासनाकडून येरळेतील वाळू विक्रीचे लिलाव घेण्यासाठी या कंत्राटदारांमध्ये स्पर्धा सुरू झाली· सरकारी अधिकारी आणि वाळू कंत्राटदार यांची सांगड बसली· त्यांनी येरळेतील वाळूरूपी नैसर्गिक संपत्ती लुटण्याचा दृढ निर्धार केला· येरळेच्या पात्रातील वाळू नेण्यासाठी ट्रक नदीपात्रात घरघरू लागले· सांगली, कोल्हापूर, इस्लामपूर, रत्नागिरी, चिपळूण, पुणे, मुंबई या ठिकाणी कृष्णा-वारणेच्या पाण्यावर गब्बर झालेल्या तसेच कामगारांच्या श्रमावर बेहिशोबी संपत्ती गोळा करून गर्भश्रीमंत झालेल्या मंडळींची बंगले बांधण्यासाठी, येरळेच्या पात्रातील वाळूचे ट्रकच्या ट्रक भरभरून कंत्राटदार पाठवू लागले· वाळू कंत्राटदार आणि सरकारी अधिकारी वर्गाने, मुरूम, माती, वाळू याच गोष्टी खो-याने ओढता येतात असे नाही तर पैसा सुध्दा खो-यानं ओढता येतो हे संगनमताने चाललेल्या "वाळू उपसा धंद्या"तून दाखवून दिले· येरळेच्या पाण्यापेक्षा कोरडया पात्रातील वाळूतून किती प्रचंड पैसा मिळतो यांचे इंगीत या मंडळींना माहीत पडले· परंतु वाळूचा उपसा झाल्यावर भूगर्भातील पाण्यावर त्याचा काय परिणाम होतो याचा किंचितही विचार न करता स्वतःचे खिसे भरण्यासाठी वाळूचा प्रचंड उपसा सुरू केला·

सरासरी 1 ब्रास वाळू 60 रूपयाने विकली जाई· 100 ब्रासचे 6,000/- रूपये कंत्राटदारांना मिळत· 100 ब्रास वाळू विक्रीसाठी 1100/- रूपये रॉयल्टी शासनाला मिळत असे· वाळू भरणा-या मजूरांना ट्रक मालकच मजूरी देत असत· वाळू विक्री परवाना धारकाने एका ब्रासचे 60 रूपये ट्रक मालकाकडून घेवून त्याला पावत्या देण्याचे आणि किती वाळू भरली जाते त्याकडे लक्ष ठेवायचे· एवढेच त्याचे काम होते· बस्स, हसतखेळत वाळू परवाना धारकाला 100 ब्रासच्या एका परवान्यावर 4 ते 5 हजार निव्वळ नफा मिळू लागला· मग एकाच पावतीवर तीन-तीन ट्रक विकले तर तो "जादा" नफा वेगळाच· जरी वाळू विक्रीचा लिलाव घेतला तरी या हिशेबात काही फरक पडत नाही· उलट कधी कधी शासनाला द्यावे लागणारे रॉयल्टीचे पैसे कमीसुध्दा असतात· अगदी कमी त्रासात आणि एका दिवसात वाळू कंत्राटदारांच्या संपत्तीत 4 ते 5 हजारांनी वाढ होत असे·[4]

बलवडी-तांदुळवाडीच्या येरळेच्या पात्रात हा धंदा सुरू झाला· ट्रकांच्या घरघरीने जेव्हा शिवार घुमू लागले तेव्हा या गावाचेही स्वरूप बदलू लागले· दुष्काळाने त्रासलेले कष्टकरी शेतकरी व मजूर वाळूचे ट्रक भरण्याचे काम करू लागले· हे काम विशेषतः

रात्री चालत होते· राब-राब राबून ही माणसे 24 तासात 50 रुपये मजूरी मिळवित होते· मजुरीच्या हव्यासापोटी आणि पोटाची खळगी भरण्यासाठी ही मंडळी रात्रंदिवस राबत होती· त्यामुळे भयानक थकवा येवून अनेक मजुरांनी आपल्या आजारापोटी डॉक्टर मंडळींचे खिसे भरले· काही मजुरांनी थकवा घालविण्यासाठी दारूच्या व्यसनात स्वतःला अडकवून घेवून दारुगुत्तेवाल्यांच्या घरी, रात्रंदिवस राब-राब राबून मिळविलेली मजूरी नेवून ओतली· मजुरी दररोज मिळत असल्यामुळे हातात पैसा खेळू लागला· त्यातून काही मजूर पत्ते, जुगार यासारखे संसार उद्ध्वस्त करणारे नादही करू लागले· दुष्काळाने पिडलेली ही राबणारी माणसे स्वतःच्याच हाताने वाळूच्या खड्डयामध्ये याप्रकारे कबर खोदू लागली·[5] गावातील सामाजिक शांतता नष्ट झाली· गावातून भांडणतंटे वाढू लागले· दोन्ही गावांना दुःखद अवकळा प्राप्त झाली· या भयानक परिस्थितीविषयी कार्यकर्त्यांना आणि राबणा-यांना चिंता वाटू लागली· येथील दुष्काळ हटवून पुन्हा शेती पिकविण्यासाठी काहीतरी उपाय योजना केली पाहिजे हा विचार कार्यकर्त्यांनी सुरू केला·

## 4·2 घरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

खानापूर तालुक्यातील दुष्काळाने जर्जर झालेली जनता, मुंबईच्या संपाने बेकार होऊन आलेले गिरणी कामगार आणि मुक्ती संघर्ष चळवळीचे कार्यकर्ते एकत्रित येऊन दुष्काळरूपी राक्षसाला कायमचा गाडण्याचा विचार करू लागली· त्यांनी आधुनिक विज्ञान जाणणा-या तज्ज्ञाना बोलावले· आमच्या भागात दुष्काळ का पडतो आणि हा दुष्काळ हटविता येईल का याची त्यांच्याकडे कष्टक-यांनी विचारणा केली· हा भाग पावसाच्या छायेचा आहे· डोंगर माथ्यावर धो-धो पाऊस पडतो· डोंगर ओलांडून काही अंतरावर कोरडे राहते· तो हा भाग आणि हा भाग सगळा उंचावर आहे· नदीच्या खो-यापासून लांब आणि उंचावर त्यामुळे नदीचे पाणीही नाही· त्यामुळे दुष्काळ हटणार नाही असे ही तज्ज्ञ मंडळी सांगू लागली·

शेतक-यांना पटलं नाही, ते म्हणाले आमचे आजे तर शेती करत होते· नदी-नाले आठ महिने पाणी देत होते· आता पावसाळा संपला की पाणी संपते, विहिरीदेखील आटतात· दुसरा हंगाम होतच नाही पण पाऊस तेवढाच पडतो· वाडवडिलांच्या काळापासून तो कायम आहे· मग घोटाळा माणसाच्या नियोजनाचा आहे, चूक माणसाची

आहे· माणसानेच सुधारली पाहिजे· गावक-यांनी दुष्काळ हटविण्याचा पक्का निर्णय घेतला·[6] हा निर्णय घेत असताना त्यांच्यावर म·फुल्यांच्या आसूडाचा तसेच कोल्हापूर फडपध्दतीचा प्रभाव होता· या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा त्यांनी वापर करण्याचे ठरविले·

1· **म·फुल्यांच्या आसूडाचा प्रभाव :-**

येथील कष्टक-यांनी फुल्यांच्या विचारांची परंपरा चालू ठेवली आहे· त्यामुळे फुल्यांनी शेतक-यांच्या सर्वांगीण मुक्तीचा विचार मांडला आहे· त्याचा अभ्यास करून शेतक-यांची दैन्यावस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी चळवळ सुरू केली आणि फुल्यांच्या विचाराप्रमाणे शेतीचा विकास करण्याची योजना प्रत्यक्षात राबविण्याचे ठरविले·

म·फुल्यांच्या मते शेतक-यांची परिस्थिती मोठी वाईट आहे· कारण त्याचे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक शोषण होत आहे· सावकारशाही, नोकरशाही व साम्राज्यशाही या तीन जळवा त्यांचे आर्थिक शोषण करीत आहेत· त्यांनी "गुलामगिरी", "शेतक-याचा आसूड" या पुस्तकातून शोषणाचे हे विविध प्रकार सविस्तर वर्णन केले आहेत·

म·फुले यांच्या मते शेतीच्या विकासासाठी पाणी असणे मोठे गरजेचे आहे· शेतक-यास पाणी मिळाले तर तो खराब जमिनीवरही चांगले पीक काढू शकतो· खडकाळ जमिनीतही उत्पन्न निघू शकते पाणी गेले की त्याचे ऐश्वर्य जाते· सृष्टीक्रमाप्रमाणे पर्जन्य कोणत्याही एका भागावार पडला तर दुस-या भागावर पडत नाही· त्यामुळे शेतकरी लोकांस अन्नधान्याची तूट पडते· त्यामुळे सतत बारा महिने कॅनालने पाणी मिळाले तर हवेच आहे·[7]

यासाठी आपल्या "शेतक-याचा आसूड" या पुस्तकात म·फुल्यांनी शेतीच्या बाबतीत खालील सुधारणा शासनाने कराव्यात असे सुचविले आहे·

1· डोंगर-टेकडयावरील गवत, पालापाचोळा, मेलेले कीटक व श्वापद यांच्या हाडामासाचे सत्त्व, पानाफुलांचे कुजलेले खत, पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून जागोजाग तालीवजा बंधारे बांधावेत· त्यामुळे वळवाचे पाणी एकंदरीत शेतात मुरून नदी-नाल्यास मिळेल असे केल्याने शेत सुपीक होईल·

2. हे काम लष्करातील काळ्या-गोऱ्या शिपायांकडून करून घ्यावे त्याचप्रमाणे या पोलीस व शिपायांकडून डोंगर टेकडयांमधील द-याखो-यांनी तलाव-तळी जितकी होतील तितकी सोयीसोईने बांधून काढावीत म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढया-खोडयांनी भर उन्हाळ्यात पाणी असल्यामुळे जागोजागी धरणे होतील. विहिरींना पाणी मिळेल आणि बागायती शेती होईल.

3. शेती धुपून त्यात खोंगळ्या पडू नयेत म्हणून शेतक-यांनी पाणलोटाच्या बाजूने शेताच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात.

4. ज्या ठिकाणी झरे सापडतील त्या ठिकाणी, गावाच्या नकाशात नमूद करून विहिरी पाडाव्यात. या विहिरी स्वतः बांधणारास लहानमोठी बक्षिसे देण्याची सरकारने व्यवस्था करावी.[8]

म.जोतिबांनी 100 वर्षापूर्वी समग्र पाणलोट क्षेत्र विकासाची जी सुंदर संकल्पना मांडली आहे ती आजच्या मायबाप सरकारला व त्याच्या पाटबंधारे खात्याला अंमलात आणावी असे वाटत नाही. कार्लमार्क्सने आपला साम्यवाद औद्योगिक दृष्टया पुढारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांच्यासाठी मांडला परंतु त्या राष्ट्रांनी तो स्वीकारला तर नाहीच उलट दूर फेकून दिला. परंतु 19 व्या शतकात मार्क्सचा हा विचार रशिया, चीन आणि पूर्व युरोपातील अविकसित राष्ट्रांनी स्वीकारला. त्याची आपल्या देशात प्रत्यक्ष अंमलबजावणी केली आणि स्वतःचा विकास केला. त्याच पध्दतीने म.फुल्यांनी राज्यकर्त्यांच्या-साठी सांगितलेली "आसूडा"ची कल्पना त्यांनी स्वीकारली तर नाहीच उलट तिची अंमलबजावणी करणा-या बलवडी-तांदुळवाडीच्या शेतक-यांची अडवणूक करण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी स्वीकारले. एकंदरीत म.जोतीराव फुल्यांनी सुचविलेली उपाय योजना, शेतक-यांच्या सर्वांगीण मुक्तीसाठी सर्वांगीण सुधारणेचा कार्यक्रम यांनी प्रभावित झालेल्या खानापूर तालुक्यातील जनतेने दुष्काळावरचा उपाय फुल्यांच्या विचारात शोधून त्याप्रमाणे लहान-लहान स्वरूपाचे बंधारे बांधण्याचे ठरविले आणि त्याचा पहिला प्रयोग म्हणून बळीराजा धरणाची संकल्पना उदयाला आली.

2. <u>कोल्हापूर फडपध्दती</u> :-

बळीराजा स्मृती धरण हे "लोकांनी बांधलेले धरण", "लोकांच्या श्रमदानातून आणि लोकवर्गणीतून बांधलेले धरण" याप्रकारे प्रसिध्द झाले आहे. फडप

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अशा प्रकारची धरणे महाराष्ट्रात 13 व्या शतकापासून अगदी अलिकडच्या 10 वर्षाच्या काळापर्यंत अस्तित्वात होती. अशा धरणांच्या पार्श्वभूमीवरच बळीराजाची उभारणी झालेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्रात अहमदनगर, नाशिक आणि दक्षिण महाराष्ट्रात अशाप्रकारची धरणे अस्तित्वात आहेत. ही धरणे लोकवर्गणीतून झालेली आहेत. कोल्हापूर जिल्हयात आसुर्ले पोर्ले परिसर, भोगावती नदीच्या वरच्या खो-यात अशाप्रकारची धरणे स्वातंत्र्योत्तर काळातही बांधलेली आहेत.

पूर्वीपासून महाराष्ट्रात 50 टक्के गावात ओढयांना अशाप्रकारची धरणे बांधून आडवा पाट काढला जाई. या पाटातून धरणातील पाणी शेतक-यांच्या शेतीला दिले जाई. हे धरण बांधण्याचे आणि पाट खोदण्याचे काम, त्या त्या परिसरातील शेतकरी एकत्र येवून श्रमदानाने करीत. पाण्याचा पाट डोक्याच्या फेठ्याने माप घेवून, जेवढी जमीन या धरणाच्या पाण्याने भिजणार आहे, त्या मापाने काढला जाई. जे शेतकरी पाट काढीत असत त्यांनाच पाणी दिले जाई. या पध्दतीलाच "फड पध्दत" असे म्हणतात. महाराष्ट्राच्या इरिगेशन पध्दतीत हे नाव रूढ आहे. ही पध्दत ब-याच काळापासून प्रचलित होती. सध्याही काही भागात या पध्दतीने ओढयावर अजूनही बंधारे बांधले जातात.

अलिकडे कोल्हापूर जिल्हयातील शेतक-यांनी या फड पध्दतीतील, कच्च्या बांधकामाऐवजी पक्के बंधारे लोकवर्गणीतून बांधले आहेत. शासनाचे कसल्याही प्रकारचे सहकार्य न घेता लोकशक्तीच्या जोरावर असे बंधारे बांधले आहेत. अशा प्रकारच्या सामुदायिक धरणातून सामुदायिक श्रमाने पाणी उचलले जाते. या धरणातील पाण्यावर विशिष्ट प्रकारची समान पिके निवडून, प्रत्येकाच्या समान क्षेत्राला पाणी दिले जाते. समान पाणी वाटप समान पीक ठेवून केले जाई यालाच "कोल्हापूर फड पध्दती" असे म्हटले जाते. या पध्दतीत पाण्यावर शेतक-यांची सामुहिक मालकी होती. त्यामुळेच त्याचे वाटप योग्य पध्दतीने होऊन ते सर्वसामान्यांनासुध्दा उपलब्ध होत होते. सध्या कोल्हापूर जिल्हयात फड पध्दतीचा एक बंधारा शासनाच्या ताब्यात आहे. परंतु तो बंद अवस्थेत आहे.

अलिकडच्या महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमुळे ओढयांचे पाणी नष्ट झाले. पूर्वी ओढे 10-10 महिने वाहत असत, ते आज पावसाळ्यात 10-12 दिवस सुध्दा वाहत नाहीत. तसेच शासन आणि भांडवलदारांनी दुष्काळी भागातील, पाणलोट क्षेत्रातील

वृक्षतोड करून शिवार उजाड केली आहेत. वृक्षतोड आणि पावसाच्या अनियमितपणामुळे येथील ओढे कोरडे पडले आहेत. त्यामुळे फडपध्दती संपुष्टात आली आहे.

ही पध्दत शासनाने सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न केला नाही. अलिकडच्या काळात शासनाच्या इरिगेशन खात्याने फड पध्दतीवरून K.T.Weir पध्दतीचे बंधारे बांधण्याचे धोरण सुरू केले आहे. या पध्दतीचे बंधारे ओढे व नद्यावर आधुनिक पध्दतीने शासनाने बांधले आहेत. परंतु यातील पाणीवाटपाबाबत शासनाचे तर्कशुध्द आणि योग्य प्रकारचे नियोजन नाही. त्यामुळे ज्या शेतक-यांच्या हातात पाणी उचलण्यासारखा पैसा आहे, त्यांच्या हातातच सार्वजनिक निधीतून उपलब्ध झालेल्या पाण्याची मक्तेदारी गेली आहे. लहान आणि दुर्बल शेतकरी पाण्यापासून वंचित राहिला. अशा पध्दतीने शासनाने धरणे बांधून लहान, दुर्बल शेतक-यांना परावलंबी केले तसेच कष्टक-यांच्या हातातील
मालकीची धरणे काढून घेतली. फड पध्दतीमुळे "ज्यांना जमीन त्यांना पाणी" मिळत होते. परंतु अशात-हेचे समान पाणी वाटपाचे जनतेचे अधिकारही शासनाने अशा प्रकारची धरणे बांधून काढून घेतले.

कृषी औद्योगिक विकास आणि हरित क्रांतीच्या धोरणाने देशात मोठया नद्यांच्यावर मोठी धरणे शासनाने बांधली. त्यामध्ये प्रचंड पाणी साठविण्यात आले. यातून प्रचंड लोकांना धरणग्रस्त केले. या धरणातून मोठमोठे कालवे खोदून हजारो एकर जमीन बाद करण्यात आली. कालव्याचे पाणी जेथे जाईल, तेथे त्याची जमीन जास्त, त्याला पाणी जास्त असे पाणी वाटपाचे धोरण स्वीकारून काही छोटया भागांचाच विकास केला. उरलेली विस्तीर्ण क्षेत्रे पाण्यापासून वंचित राहिली. एकंदरीत शासनाने मोठी धरणे बांधून एका छोटया पॉकेटमध्ये किंवा बागायतीच्या बेटासाठीच पाण्याचा वापर केला. अशा प्रकारची धरणे बांधणे लोकांना शक्य नसते. तसेच अशी धरणे जास्तीत जास्त आपल्या भागात होण्यासाठी नेते मंडळीच्यात स्पर्धा सुरू झाली. त्यातून प्रादेशिक वादाला खतपाणी देवून प्रस्थापित राजकीय मंडळींनी आपले अस्तित्व कायम ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला. या प्रकारची धरणे लोकांना बांधणे शक्य नसल्यामुळे शासन नियंत्रित यंत्रणा त्यासाठी उभी राहते. त्यामुळे उद्योगपती व कंत्राटदारांचे धंदे मोठ्या प्रमाणात चालतात आणि त्याचबरोबर संबंधित खात्यातील अधिकारी वर्गाचेही उखळ पांढरे होते.

मोठया धरणांसाठी लागणारे "मटेरियल" मोठया उद्योगधंद्यातून येते· धरण हे लोखंड, प्लास्टिक यासारख्या संपणा-या कच्च्या मालातून बनलेले असते· यामुळे शेतक-यांचा रोजगार नष्ट होऊन लघु उद्योग धंद्यातील कामगारही बेकार होतात आणि त्यांचे स्वावलंबनही नष्ट होते· मोठया धरणासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री मोठया कारखान्यातून तयार होत असल्यामुळे भांडवली उद्योगांचे प्रभुत्व निर्माण होते· तसेच पुर्ननिर्मितीक्षम निसर्ग संपत्तीच्या आधारावर टिकावू पाणी व्यवस्था उभी राहण्याऐवजी संपणा-या कच्च्या मालावर ती आधारित असल्यामुळे व्यवस्थेचा शेवट होतो·

लोखंड तयार करणारे शास्त्र स्थानिक लोकांच्या हातून नष्ट झाले· धरणाचे साहित्य भांडवलदारांच्या हातात गेले· "पाणी कसे अडवावे, कुठे अडवावे, ते कसे वापरावे, त्याचे वाटप कसे व्हावे" हा अधिकार शासन तसेच ग्रामीण आणि शहरी भांडवलदाराच्या हातात गेला· त्यामुळे गरीब कष्टकरी शेतकरी परावलंबी झाला· त्याला पाण्यासाठी वरूणराजाची याचना करण्याशिवाय पर्याय राहिला नाही·[9] अशा पध्दतीने शेती व्यवसायावर शासन, बडे बागायतदार आणि भांडवलदार यांचे प्रभुत्व निर्माण झाले· सामान्य शेतक-यांचे अधिकार संपूर्णपणे नष्ट झाले· तसेच शेतीचे शास्त्रही नष्ट झाले· त्यामुळे बलवडी-तांदुळवाडी येथील शेतक-यांनी प्रथम हे नष्ट झालेले अधिकार आणि शेतीचे शास्त्र परत मिळविण्यासाठी स्वतःच "कोल्हापूर फड पध्दतीने" बंधारा बांधण्याचे ठरविले·

3· <u>बलवडी जुना बंधारा</u> :-

1950 साली बलवडी येथे येरळा नदीवर शासनाने 460 हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचे उद्देशाने एक बंधारा बांधला आहे· या बंधा-यातून 26 कि·मी· लांबीचा कॅनॉल खोदला आहे· परंतु या धरण योजनेतून 20 हेक्टर एवढे क्षेत्रसुध्दा ओलिताखाली येऊ शकले नाही·[10] ही धरण योजना अयशस्वी ठरली आहे· तसेच ती पूर्णही झालेली नाही· सरकार दरबारी पैसा उपलब्ध नसल्यामुळे ती रखडली आहे·

या बंधा-याबाबतच्या शासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे, हा बंधारा पूर्णपणे गाळाने भरून, त्याची पाणी साठवण क्षमता पूर्णपणे नाहीशी झाली आहे· या

बंधा-यामुळे नदीचे खालील पात्र लहान बनले असून पाण्याचा प्रवाह वेगवान बनला आहे. त्यामुळे बंधा-याच्या खालील नदीच्या पात्रातील वाळू वाहून गेली आणि खडक उघडे झाले आहे. पात्रातील वाळू वाहून गेल्यामुळे आणि यातून जी थोडी शिल्लक राहिली ती शासनाच्या सहकार्याने कंत्राटदारांनी उचलल्यामुळे नदीच्या पात्रात खडक उघडे झाले. वाळू नष्ट झाल्यामुळे पात्रात पाणी मुरण्याची व पाणी साठवण प्रक्रिया पूर्णपणे बंद झाली. त्यामुळे नदीकाठच्या विहिरींचे पाणी तर नष्ट झालेच परंतु लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागली. जनतेच्या डोळयात दुःखाश्रू येण्याची वेळ निर्माण झाली. परंतु शासनाच्या धोरणामुळे ग्रामस्थांच्या डोळयात अश्रू येण्याइतपत पाणी शिल्लक राहिले नव्हते. शासनाने आपल्या चुकीच्या धोरणाने येथील कष्टक-यांच्या तोंडचे पाणी काढून घेण्याचा प्रयत्न केला असला तरी राबणा-यांच्या अंगातील पाणी नष्ट झाले नव्हते.

येथील कष्टक-यांनी येरळेचे पावसाळ्यात वाहत जाणारे पाणी अडवण्याचे ठरविले. परंतु त्यासाठी अस्तित्वात असलेले चुकीचे आणि जुने तंत्रज्ञान फेकून देवून नवीन तंत्रज्ञानाने, नियोजन पध्दतीने, कमी खर्चात, स्थानिक साधन संपत्तीचा उपयोग करून पर्यावरणाचा समतोल राखणारे धरण बांधण्याचे ठरविले.

## 4.3 <u>धरण बांधणीचा संकल्प</u> :-

प्रतिकुल नैसर्गिक परिस्थिती, सततचा दुष्काळ तसेच विरोधी पक्षाचा भाग म्हणून विकासाबाबत सत्ताधा-यांचे दुर्लक्ष यामुळे येथील बहुसंख्य जनता उदरनिर्वाहासाठी देशभर स्थलांतरित झालेली होती. त्यामुळे खेडी ओस पडत चालली होती. आपल्या रक्ताचे, नात्याचे माणूस पोटाची खळगी भरण्यासाठी दूर जावून लाजीरवाणे जीवन जगत आहे आणि हे ताटातुटीची परिस्थिती वर्षानुवर्षे चालूच आहे. हे लोकांना सहन होईनासे झाले. म्हणूनच हे कामगारांचे, युवकांचे लोंढे थांबवून, खेडयांना पूर्वीचे स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी इथेच उद्योगनिर्मिती करून या परिस्थितीवर कायमची उपाय योजना केली पाहिजे असे स्फुल्लिंग येथील कष्टक-यांच्यात निर्माण झाले.

तसेच दुष्काळ, सरकारी भ्रष्टाचार आणि नैसर्गिक साधन संपत्तीच्या चाललेल्या नासधुसीच्या विळख्यातून कष्टक-यांची सुटका करायची असेल तर संघर्ष अटळ आहे,

याची जाणीव कष्टक-यांना होती. परंतु नुसता संघर्ष किंवा लढा उभारून उपयोग नाही कारण या भागातील खरा प्रश्न पाण्याचा होता, दुष्काळ हटविण्याचा होता. दुष्काळ हटविण्याचे कोणतेही नियोजन शासनाकडे नाही याची खात्री जनतेला झाली होती.

म्हणूनच आपण आपल्या जीवनाचा मार्ग आखला पाहिजे, शासनाच्या कुबडया घेऊन आपला विकास होणार नाही. त्यासाठी दुष्काळ हटविण्याचे नियोजन स्वतःच करण्याचा निर्धार जनतेने केला. राबणा-या जनतेतूनच काही कार्यकर्ते पुढे आले. दुष्काळ का पडतो याचा अभ्यास सुरू झाला. तालुक्यातील अनेक विहिरी कोरडया ठणठणीत असल्याचे दिसले. दुष्काळ हा निसर्गाच्या कोपामुळे नव्हे तर माणसाच्या चुकीच्या नियोजनामुळे पडतो, असे ठाम मत कार्यकर्त्यांचे झाले. पाण्यामुळे दुष्काळ पडतो, पाण्याच्या टंचाईमुळे त्याची तीव्रता जाणवते. म्हणूनच दुष्काळ हटवायचा असेल तर पाणी उपलब्ध करणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय गावचा विकास नाही. दुष्काळ हटविण्यासाठी पाणी अडविणे महत्त्वाचे आहे. अशी चर्चा कष्टक-यांत सुरू झाली.

या चर्चेतूनच चळवळीचे जेष्ठ कार्यकर्ते आणि बलवडी गावचे तत्कालीन उपसरपंच कै. शंकर पांडुरंग पवार (बंडू आप्पा) यांनी येरळा नदीवर बलवडी-तांदुळवाडीच्या परिसरात बंधारा बांधण्याची कल्पना मांडली. येरळेचे पावसाळ्यात वाहत जाणारे पाणी अडवून ते टंचाईच्या काळात शेतीला वापरण्यासाठी उपयुक्त ठरेल अशा प्रकारचे या धरणाचे महत्त्व कष्टक-यांना पटवून देण्याचे काम मुक्ती संघर्ष चळवळ आणि मुंबईचे संपकरी गिरणी कामगार यांनी केले. हा विचार लोकांना पटला. अशाप्रकारचे धरण फल्यांच्या आसूडातील शेती सुधारण्याच्या विचाराने आणि कोल्हापूर फड पध्दतीने बांधण्याचा विचार पुढे आला. धरण बांधकामासाठी उपलब्ध असणारी नैसर्गिक साधन संपत्ती जी वाळूच्या रूपाने येरळेने प्राप्त करून दिलेली आहे. तिचा वापर करण्याचे ठरले. धरण बांधकामासाठी संघटनेने वाळू उपसा परवाने शासनांकडून घेवून, योग्य पध्दतीने वाळू उपसा करून तिची विक्री करावी आणि या वाळू विक्रीतून मिळालेल्या नफ्यातून तसेच कष्टक-यांच्या श्रमदानातून धरण उभे करण्याचे ठरले.[11] धरणात साठलेले पाणी शेतीला देवून दुष्काळ तर नष्ट करता येईलच त्याचबरोबर वाळू परवाने संघटनेमार्फत घेवून, बेसुमार चालू असलेल्या वाळू उपसण्यास प्रतिबंध करता येईल असाही उद्देश या धरण बांधणीमागे होता. या प्रकारे येरळामातेकडून मिळणारी संपत्ती पाण्याच्या रूपाने तिलाच परत करण्यासाठी

धरण बांधणीचा संकल्प तालुक्यातील दुष्काळपीडित जनता, संपकरी कामगार, बलवडी-तांदुळवाडीचे ग्रामस्थ आणि मुक्ती संघर्ष चळवळीने केला.

4.4 **बळीराजाचा जन्म :-**

दिपवाळीचा सण खेडयात मोठया धार्मिक भावनेने आणि उत्साहाने साजरा केला जातो. या सणात सर्वत्र आनंदी वातावरण असते. शेतकरी राजा रब्बी मौसमाची पेरणी संपवून थोडासा निवांत झालेला असतो. घरोघरी परगावी असलेले नोकरदार मंडळी आलेली असतात. नात्या-गोत्यातील मंडळीच्या सहवासात ही दिपवाळी भक्तिभावाने साजरी केली जाते. फटाक्यांचे आवाज, नवी कपडे, घरांची थोडीबहुत रोषणाई, घरात गोडधोड पदार्थ यामुळे सर्वत्र वातावरण प्रसन्न बनलेले असते. परंतु अलिकडची भीषण दुष्काळ परिस्थिती आणि वाढती महागाई यामुळे या वातावरणात फरक पडल्याचे दिसत आहे. "दिवाळी म्हणजे दिवाळ काढणारा सण" असे नाईलाजाने कष्टक-यांना म्हणावे लागत आहे तरी वर्षाचा सण म्हणून बळीराजा हा सण साजरा करीत आहे. वरवर हा कष्टकरी सणानिमित्त आनंदी दिसत असला तरी त्याच्या अंतरंगातील दुःखे त्यालाच माहीत असतात.

खेडेगावात दिपावली बली प्रतिपदेचा दिवस, गुडी पाडव्याचा प्रतिपदेचा दिवस, दसरा आणि अक्षय तृतीया हे दिवस अतिशय शुभ समजले जातात. या दिवशी शेतकरी, कामगार, ग्रामस्थ नवे संकल्प, नव्या योजना, नवी कार्ये हाती घेतो. मोठया उमेदीने या दिवशी नवे काही केले जाते. या दिवशी नव्या कामाचा मुहुर्त केला तर ते काम यशस्वीपणे सिध्दीस जाते, असा समज असतो. त्यामुळे घराघरात वर्षानुवर्षे हा परिपाठ केला जातो. कोणी या दिवशी नवी नाती, सोयरिक जमविण्यासाठी बाहेर पडतात, कोणी नवे घर बांधण्याचा, कोणी शेती पेरणीसाठी तर कोणी जलसिंचन योजना, नवा बैल खरेदीसाठी तर कोणी ट्रॅक्टर, मोटार सायकल, सोने किंवा इतर संसारोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी या मुहुर्ताच्या दिवशी बाहेर पडतात. परंतु बलवडी-तांदुळवाडीच्या ग्रामस्थांनी अशाच एका बलिप्रतिपदेच्या दिवशी एक नवा संकल्प केला. तो संकल्प होता बळीराजाला आधुनिक वामनांच्या आणि दुष्काळाच्या मगर मिठीतून सोडविण्याचा.

बलवडी-तांदुळवाडीच्या कष्टक-यांनी, कामगारांनी आणि मुक्ती संघर्ष चळवळीने धरण बांधणीचा संकल्प केल्यानंतर तो सिध्दीस नेण्यासाठी प्रयत्न सुरू झाला आणि यातूनच 1986 च्या दिपावली बलिप्रतिपदेच्या दिवशी सकाळी या दोन्ही गावातील सुशिक्षित,

LIBRARY KOLHAPUR

अशिक्षित, पागोटेवाली, टोपीवाली, उन्हाने रापलेली, हातावर घट्टे पडलेली, लहान, म्हातारे, मुंबईहून सणासाठी आलेली चाकरमानी मंडळी एकत्र जमली· ही सर्व मंडळी नारळ, उदबत्त्या, साखर, गुलाल घेऊन येरळेच्या पात्रात उतरली· काहींच्या हातात कुदळ, टिकाव, फावडे, पाटया हे साहित्यसुध्दा होते· हा सर्व जनसमुदाय मोठया हिंमतीने, स्फूर्तीने, नयनरम्य स्वप्न उराशी बाळगून येरळेच्या कोरडया ठणठणीत पात्रातून चालू लागला· सकाळच्या सूर्यकिरणांनी येरळेतील वाळू तापवायला सुरूवात केलेली असते आणि याबरोबरच शेकडे कष्टक-यांचे रक्तही तापायला लागते· सूर्यकिरणांनी खो-यातील वाळूमधील गारेच्या कणांचा प्रकाश चमकदारपणे प्रतिबिंबित केलेला असतो· त्याबरोबरच लोकांच्या महत्त्वकांक्षेच्या पदराला त्यांची चमकदार किनार लाभते· येरळेच्या पात्रात विशिष्ट ठिकाणी हा जनसमुदाय थांबतो· येरळामातेची मनोभावे आराधना करून
दै·केसरी (पुणे) चे संपादक मा·चंद्रकांत घोरपडे यांच्या हस्ते संकल्पाचा नारळ वाढविला जातो· येरळा पूर्ण कोरडी असते· पूजनाच्या नारळातून पडलेल्या पाण्याबरोबरच शेकडोंच्या डोळ्यातून पडलेले दुःखाश्रू एवढेच काय ते पाणी या पात्रातील वाळूवर पडते· या पाण्यामागे मोठी आग दडलेली असते· हे नंतर बळीराजाच्या संघर्षावरून कळून येते· नारळ वाढविल्यानंतर शेकडो हात त्या ठराविक ठिकाणी नदीत पाया खोदू लागतात· येरळेच्या कोरडया ठणठणीत पात्रात टिकाव, फावडे, पाटया यांचा खणखणाट गर्जू लागतो· (हा खणखणाट कष्टक-यांच्या भावी लढयाची नांदीच होती हे नंतरच्या बळीराजा लढयावरून लक्षात येईल·) हा पाया एका अभिनव धरणाचा होता· हे धरण "बळीराजा स्मृती धरण" या नावाने उभे करण्याचा संकल्प असतो· मोठया उमेदीने, जिद्दीने, ध्येयाने प्रेरित होवून सर्व लोक कामाला लागतात· केवळ मुहुर्ताचा घाव घालून न थांबता दिवसभर शेकडो स्त्री-पुरूष कामाला लागतात· या एक दिवसाच्या श्रमदानानेच हे धरण जोमाने आणि लवकरच पूरे होणार याचा दृढ आत्मविश्वास कष्टकरी जनतेत निर्माण झाला·[11]

## ४·५ धरणाची संकल्पना :-

बलवडी-तांदुळवाडीच्या कष्टक-यांनी सुरू केलेल्या आगळया वेगळया उपक्रमाला धरणाला नाव देताना संस्कृतीमध्ये शेतक-याची नाळ शोधली आहे·[12]

पुराणकाळात शेतक-याचा राजा बळीराजा हा लोकप्रिय होता· तो उदारमनाचा होता· त्याच्या राज्यकारभाराचा लौकीक वाढू लागला तेव्हा वामनाने बळीराजाच्या उदारपणाचा

गैरफायदा घेवून कपटाने त्याला पाताळात गाडले. बळीराजाच्या राज्यात प्रजा सर्वप्रकारे सुखी होती त्यामुळे त्याची आठवण अजून शेतक-यांना होते.

'इडापिडा टळो, बळीचे राज्य येवो' असे बहुजन समाज आजही म्हणत असतो. बळीचे राज्य म्हणजे शेतक-यांचे राज्य. मात्र उच्च वर्णीय वामनाचे राज्य येवो असे म्हणतात. पुराणकथामधील हा संघर्ष केवळ कथापुरता मर्यादित नाही. आज बहुजन समाजाच्या नावाखाली त्या वर्गातील वरिष्ठांनी आपल्या हातात सत्ता ठेवली आहे. परिवर्तन झाले ते या वर्गाचे. खरा बहुजन समाज अद्यापही वंचित आहे. शेतक-याच्या नावाने कारभार करणारे 70-80 टक्के कोरडवाहू शेतक-यांचे नाहीत: तर ते बागायतदारांचे प्रतिनिधी आहेत. खुद्द बागायतदार आहेत. काबाडकष्ट करणा-यांच्या जीवनात अजून दीपावली यावयाची आहे. हे जोपर्यंत वामनसंस्कृतीचे प्रस्थ आहे तोपर्यंत कोरडवाहू सत्तर टक्के शेतकरी, वामनाने ज्याप्रमाणे बळीराजाला पाताळात गाडले त्याचप्रमाणे गाडला जाणार आहे. गरीबांच्या अन्नाच्या भरडधान्याखालचे क्षेत्र कमी झाले आहे. सामान्य माणसांच्या जेवणातील धान्यांचे, भाज्यांचे आणि डाळींचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. शेतक-यांच्या नावावर आधुनिक वामन सत्तेवर बसले आहेत ते जोपर्यंत सत्तेवर आहेत तोपर्यंत "बळीचे राज्य येवो" असेच म्हणण्याचा प्रसंग सर्वसामान्यांवर येणार आहे.

"इडापिडा टळो बळीचे राज्य येवो" असे केवळ म्हणण्याने बळीचे राज्य येणार नाही. त्यासाठी जागरूक राहून बळीचे राज्य आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. ज्यांना पोटभर अन्न मिळत नाही ते मिळेल अशी व्यवस्था आणणे म्हणजे बळीचे राज्य येणे. अधिकाधिक शेतक-यांकडे जमीन येणे म्हणजे बळीचे राज्य. आणि लहान व कोरडवाहू शेतक-यांच्या हिताची धोरणे राबवणारे सरकार सत्तेवर येणे म्हणजे बळीचे राज्य होय.[13]

बलवडी-तांदुळवाडीच्या कष्टकरी शेतक-यांनी सुरू केलेल्या अभिनव धरणाला "बळीराजा स्मृती धरण" असे समर्पक नाव दिले. बळीराजाचे नाव या धरणाला देण्यापाठीमागे ग्रामस्थांचे प्रमुख दोन उद्देश आहेत. एकतर ग्रामीण भागतील शेतकरी "बळीराजा" म्हणून ओळखला जातो. आणि येथील शेतक-यांनी स्वतःच्या कर्तृत्वावर या धरणाची उभारणी करण्याचा संकल्प सोडला आणि दुसरे म्हणजे या ग्रामीण भागतील दानशूर, कर्तृत्ववान पण निसर्गाच्या आणि मानवी दुष्काळाच्या पापाखाली गाडल्या जात असलेल्या बळीराजाच्या

डोक्यावरील हे पाप बळीराजानेच जमिनीत गाडण्याचा हा संकल्प केल्याने या धरणाला "बळीराजा स्मृती धरण" असेच समर्पक नाव सर्वानुमते ठरले. या नावाची यथार्थता नंतरच्या काळात सर्वांना पटत गेली.[14]

बळीराजा स्मृती धरण म्हणजे पुराणातील बळीराजाच्या वंशजांनी बांधलेले धरण होय. बळीराजाचे नांव धरणाला देण्याला खानापूर तालुक्यातील जनतेच्या दुष्काळविरोधी लढयाचा इतिहास दुष्काळ हटविण्याचे एक धोरण आहे.

"बळीराजा स्मृती धरण" म्हणजे राबणा-या जनतेने स्वतःचा दुष्काळ घालविण्या-साठी स्वतःच नियोजन करून शासनाला ते अंमलात आणण्यासाठी भाग पाडण्याचाच एक भाग आहे. हे धरण म्हणजे दुष्काळविरोधी पर्यायाच्या "आसूड"चीच म्हणजे सोप्या भाषेत चाबकाची मजबूत वादी आहे.

"बळीराजा स्मृती धरण" हे केवळ धरण नसून ती दुष्काळ हटविण्याची एक चळवळ आहे.[15]

दुष्काळाची वारंवार झळ पोहचणा-या भागामध्ये खडी फोडणे, रस्ते बांधणे, चारा तगाई, पीक तगाई, शेती कर्ज यासारखे तकलादू उपाय करून जखम एकीकडे तर मलमपट्टी दुसरीकडे असे धोरण स्वीकारण्यापेक्षा समस्येच्या मूळालाच बळीराजाने हात घातला आहे.

## 4.6 बळीराजा धरण चळवळीची भूमिका :-

बळीराजा स्मृती धरण हे 1986 पासून देशात गाजत आहे. धरणाच्या सुरूवातीपासूनच ते वादाच्या वादळात सापडले आहे. या धरणाच्या भूमिकेमुळे ते प्रसिध्दीला आले आहे. देशातील कष्टकरी शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी, डॉक्टर, वकील, कलाकार, पत्रकार, शिक्षक इ.वर्गामध्ये या धरणाविषयी सहानुभूती आढळते. तर भांडवलदार मोठे बागायतदार, काही राजकीय पुढारी आणि शासन यांनी या धरणाविषयी पूर्णपणे विरोधाची भूमिका घेतली आहे. ही विरोधी मंडळी धरणाविषयी गैरसमजही पसरविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

बळीराजाने प्रस्थापित मंडळी आणि यंत्रणेला आव्हान देणारी भूमिका स्वीकारलेली आहे. गरीब, दुष्काळग्रस्त, कोरडवाहू शेतक-यांच्या सर्वांगीण प्रगतीचा कार्यक्रम या धरणाने पुढे आणला आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय गुलामगिरीत अडकलेल्या समाजाची मुक्तता करण्याचे ध्येय बळीराजा धरणाने स्वीकारले आहे. दुष्काळ आणि सरकारी धोरणाने नागवला जात असलेल्या शेतक-यांची शोषणमुक्तता करण्याची भूमिका या धरणाने स्वीकारली आहे.

बळीराजा धरणाचा उदय आणि निर्मितीच प्रामुख्याने राजकीय संघर्षातून झालेली आहे. बळीराजा धरणासारखी धरणे समाजाच्या विकासासाठी शासनाकडून बांधली जातात. समाजाच्या विकासाचे धोरण शासन ठरविते. परंतु बळीराजा धरणाबाबत लोकांनीच आपल्या विकासासाठी स्वतःच निर्णय घेवून, प्रत्यक्ष धोरण आखून, शासनाची कसलीही मदत न घेता त्याची अंमलबजावणी केलेली आहे म्हणूनच हे धरण वैशिष्टयपूर्ण आहे.

"एखादे धरण बांधून त्या कार्याचा व कर्तृत्वाचा वापर करून निवडणूका लढविणे अगर निवडणूकीच्या संदर्भात एखाद्या राजकीय पक्षाचे वजन वाढविणे यासारखा उद्देश या धरण बांधणीमागे किंचितही नाही.[16]

या धरणाचे राजकीय उद्दिष्ट स्पष्ट करताना डॉ. भारत पाटणकर म्हणतात, "राजकारण याचा अर्थ या देशावर सत्ता कोणत्या जातीची, वर्गाची चालते, यातून शोषण कसे होते. या आधारावर हे शोषण पूर्णपणे संपून कामगार, शेतमजूर, कष्टकरी, स्त्रिया दडपलेल्या सर्व बहुजन जाती यांची मुक्ती होणे आणि त्यांचे जीवन घडविण्याचा हक्क अथवा आधार मिळणे हे उद्दिष्ट आहे. राजकारणाचा अर्थ खोलात जाऊन पाहिला तर मूलतः सत्ता कोणाची चालणार यावर चाललेला मूलभूत संघर्ष याला राजकारण म्हणतात.

निवडणूकीतून मूलतः सत्ता बदलत नाही फक्त सत्तेवरील वर्ग बदलतो. ज्याप्रमाणे रेल्वेचे इंजिन बदलते, परंतु रूळ बदलत नाही आणि गाडीही बदलत नाही. या दुस-या अर्थाने बळीराजा चळवळीचे राजकारण आहे. बळीराजा धरणाने मानवमुक्तीचे राजकारण पुढे आणले आहे.

1· **उपलब्ध निसर्ग संपत्तीवर जनतेचा अधिकार :-**

उपलब्ध निसर्ग संपत्तीचा (बळीराजा धरणाच्या बाबतीत वाळू) उपयोग करण्याचा अधिकार प्राथमिक दृष्टया शासनाचा नसून स्थानिक जनतेचा आहे· नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग कसा करावा, तिची विल्हेवाट कशी लावावी हा निर्णय घेण्याचा अधिकार स्थानिक जनतेला असला पाहिजे· अशा प्रकारचा प्रमुख उद्देश बळीराजाचा आहे· यातून शासनाची सर्वाधिकारी सत्ता, सर्वाधिकार घेवून, लोकांच्या डोक्यावर राज्य करण्याची पध्दत नाकारण्याचे राजकारण पुढे येते·

2· **निसर्ग संपत्तीचा योग्य वापर :-**

निसर्ग संपत्तीचा वापर करण्याची पध्दत ही स्थानिक जनतेला लांब पल्ल्याने टिकावू व समृध्द जीवन देणारी आणि पर्यावरणाचे आरोग्यदायक संतुलन राखणारी असावी· नैसर्गिक संपत्ती म्हणजे ओरबाडून संपविण्याची गोष्ट हे प्रस्थापित विकासनीतीचे तत्व नाकारून समृध्दी वाढविण्यासाठी आणि शोषणमुक्तीसाठी तिचा उपयोग करणे आणि प्रामुख्याने जतन करणे कसे शक्य आहे हे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे·

3· **विकासकामात जनतेचा सहभाग आवश्यक :-**

विकासाची कामे कोणती करावीत, कशी करावीत हे शासन किंवा निवडून गेलेले प्रतिनिधी यांच्या मनाला येईल तेव्हा आणि त्यांना हिताचे वाटेल तसे ठरविणार या प्रस्थापित भांडवली राजकीय सत्तेच्या नियमाला आणि अधिकाराला बळीराजा चळवळीने आव्हान दिले· या त-हेचे निर्णय कष्टकरी जनता स्वतःच घेईल आणि अंमलात आणील असे यातील राजकारणाचे दुसरे अंग आहे·

4· **पाण्याचा हक्क :-**

प्रस्थापित भांडवली अर्थ रचनेच्या नियमानुसार प्रत्येक वस्तू ही शासनाची किंवा व्यक्तीची खाजगी मालमत्ता असते· पाण्याबाबत प्रस्थापित नियम असा आहे की, "ज्याच्या मालकीची जमीन जास्त, त्याला पाणी जास्त·" बळीराजा चळवळीने हा नियम नाकारला· पाणी हे सर्व जनतेची सामुदायिक मालकीची निसर्ग संपत्ती आहे· भूमिहिनासह सर्व स्त्री-पुरूषांना जमीनपयोगी पाण्याचा समान वाटा मिळण्याचा अधिकार प्रस्थापित

केला· यातून नैसर्गिक संपत्तीचा असमान उपभोगाचे अधिकार नाकारण्याचे राजकारण पुढे येते·

## 5· स्वावलंबी व निर्भर शेती :-

कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त सिंचनक्षेत्र निर्माण करू शकणारे शास्त्र हेच स्वावलंबी शेतीचे शास्त्र आहे· यातूनच जास्तीत जास्त कुटुंबाना जीवनावश्यक गरजा भागविण्याइतके शेतीवापराचे पाणी देणे शक्य आहे· जास्तीत जास्त क्षेत्रातील पर्यावरण सुधारण्याचाही मार्ग याच पायावर निघू शकतो· म्हणून जैविक मालावर आधारित शेती हे पाणी वापराचे नवे शास्त्र वापरण्याचा पाया केला पाहिजे हे धोरण पुढे आणले·

ज्या त-हेचे पाणीवाटप बळीराजाने केले आहे आणि ठरविलेल्या पीक पध्दतीला जेवढे पाणी प्रमाण गृहीत धरले आहे· त्याचा आधार स्वावलंबी शेती हा आहे· पृथ्वीच्या पोटातून नष्ट होणा-या कच्च्या मालाच्या आधारावर आणि पर्यावरण हानीकारकरित्या बदलणा-या प्रक्रियेतून तयार होणारी रासायनिक खते कमीत कमी वापरून आणि अंतिमतः त्यांचा वापर पूर्णतः बंद करून, स्थानिक निसर्ग चक्राच्या विज्ञानाच्या आधारावर जर शेतीचा कस वाढविला तरच इतक्या कमी पाण्यात अशी शेती करणे शक्य आहे· यामधून केंद्रीभूत औद्योगिक भांडवलशाहीचे प्रभुत्व नाकारणे, माणसाबरोबरच निसर्गाचे शोषण करण्याची रीत् नाकारणे आणि विकेंद्रीत, स्वावलंबी आणि कष्टकरी जनतेच्या अधिकारातले उत्पादन प्रस्थापित करणे हे या चळवळीचे राजकारण आहे·

## 6· रोजगार निर्मिती :-

बळीराजाची पाणी वापर यंत्रणा (जलसिंचन योजना) राबवित असताना आयात केलेल्या खास कच्च्या मालाच्या आधारावर बनविलेल्या पी·व्ही·सी·पाईप सारख्या वस्तू कमीत कमी वापरल्या आहेत· त्यासाठी भारतातल्या पेट्रोलजन्य कच्च्या मालाचा उपयोग करून बनविलेली खास प्रायोगिक पाईप पाणी वितरणासाठी वापरली आहे· त्याचबरोबर इतर वस्तू प्रामुख्याने स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती करून बनविण्यात आल्या आहेत· या वितरण व्यवस्थेमुळे आयातीवर आधारलेल्या वस्तू निर्मितीला पर्याय दिला जातो·[17] स्थानिक पातळीवर आणि नगण्य गुंतवणूकीच्या आधारावर विकेंद्रीत उद्योग चालू होतात· तांत्रिक निर्णयात प्रत्यक्ष लाभधारकांचा सहभाग घेण्याची रीत

अवलंबिल्यामुळे ही जास्त शास्त्रीय, स्वस्त आणि मनात रुजणारी होते.

7. **अनुभवजन्य विज्ञानाचा वापर :-**

विज्ञान-तंत्रज्ञान देईल तो गठ्ठा तथाकथित "अडाणी" राबणा-या जनतेने जसाच्या तसा, खाली मान घालून स्वीकारला पाहिजे हा व्यवहार चळवळीने नाकारला. अनुभवातून (आणि कदाचित चर्चा, वाचनातूनही) निर्माण झालेल्या आमच्या ज्ञानाच्या आधारावर आम्ही विज्ञान, तंत्रज्ञान तपासून घेऊ आणि मगच स्वीकारू असा व्यवहार सुरु केला.

8. **स्वयंनिर्भरता :-**

बळीराजा धरण चळवळ म्हणजे दुष्काळ हटविण्याची चळवळ आहे. कुणाचेही नुकसान न करता राबणा-या जनतेने आणि दुष्काळ जावा असे वाटणा-या सर्वांनी दुष्काळ निर्मूलनासाठी प्रत्यक्षात आणलेली एक उपाय योजना आहे. सरकार घालविल तेव्हा दुष्काळ जाणार हा व्यवहार या चळवळीतून फेटाळला. दुष्काळ निर्मूलनाचे नियोजन आमचे आम्ही करु शकतो, त्यासाठी लोकवैज्ञानिक दृष्टिकोण असलेल्या लोकांशी दोस्ती करु शकतो आणि असे नियोजन अंमलात आणण्याचा आम्हाला हक्क आहे हे त्यांनी सिध्द केले.

9. **प्रायोगिक शेती :-**

पर्यावरण संतुलन राखणारी, चारा वैरण उपलब्ध करणारी शेतीपध्दत अन्नधान्य, फळफळावळ बळीराजाने स्वीकारली. प्रयोग करून शेतीपध्दत स्वतः ठरविण्याचा, त्यासाठी हक्काचे पाणी मिळविण्याचा अधिकार बळीराजासाठी उभारलेल्या चळवळीतून प्रस्थापित झाला.[18]

याप्रकारे बळीराजा धरणाची भूमिका ही मानवमुक्ती, शोषणमुक्ती आणि समृध्दीचे अंतिम ध्येय साध्य करण्याकडे वाटचाल करणा-या संघर्षाचा तो एक प्राथमिक टप्पा आहे. मानव निसर्ग संबंधाच्या निरोगी, संतुलित, मैत्रीपूर्ण अशा नव्या नात्याची प्रस्थापना करण्याकडे पडलेले ते एक पाऊल आहे.

4·7 **बळीराजा धरण चळवळ – एक लोक लढा**

बळीराजा स्मृती धरण चळवळींची निर्मिती ही स्वयंभू अशी आहे· ही चळवळ लोकमनातून उभी राहिली· तिला मुक्ती संघर्ष चळवळीने पाठबळ दिले· लोक दुष्काळाने जर्जर झाले होते· शासनाच्या विकास योजनांचा फारसा उपयोग आपल्याला होत नाही· हे लोकांनी जाणले· दुष्काळाचा कायमचा बंदोबस्त केला पाहिजे असे प्रत्येकाला वाटू लागले आणि यातूनच "बळीराजा स्मृती धरणाची"योजना पुढे आली· परंतु हा धरणाचा मार्ग कसा आणि किती प्रमाणात यशस्वी होईल याबद्दल लोकांच्या मनात संभ्रम होता· कारण या परिसरात इंग्रजांच्या काळापासून मंजूर होऊनही, शासनाच्या हिंगणगाव धरणाची अपूर्णता, बलवडीच्या जुन्या बंधा-याची अयशस्वीता तसेच ताकारी उपसा जलसिंचन योजनांची दुर्दशा या भागातील लोकांच्यासमोर आहेत· शासनाने पाण्यासारखा पैसा खर्च करूनही या योजना फसल्या आहेत· त्यामुळे कष्टकरी जनतेची धरण योजना फलदायी ठरेल का व ती कितपत पूर्ण होईल याबाबत लोक साशंक होते·

म्हणूनच बळीराजा धरण उभारणीच्या प्रस्तावाला लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी चळवळीतील आणि या धरणाच्या पूर्णत्वासाठी सहानुभूती असणा-या कार्यकर्त्यांनी संपूर्ण येरळा खो-याचा पायी प्रवास सुरू केला· येरळा खो-यातील लोकांना वेगवेगळ्या प्रचार माध्यमाव्दारे बळीराजाचे महत्त्व आणि उपयुक्तता पटवून देण्याचे कार्य सुरू केले· लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी जनजागरण मोहीम राबविण्यात आली· गावोगावी प्रचारफे-या, सभा, मेळावे, परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित केली· या सभा मेळाव्यातून बळीराजाला शास्त्रीय पाया देण्याचे कार्य प्रथम कार्यकर्त्यांनी केले· त्यासाठी पर्जन्य, पाण्याचा साठा, अंतर्गत भूस्तर रचना व त्याचा विहिरींच्या पाण्यावर होणारा परिणाम, शासनाची अनुत्पादक कामे, नवीन शेती तंत्र, जलसिंचन संशोधन इ·बद्दलची माहिती देण्यात येवू लागली· अशा प्रकारची माहिती "मुक्ती संघर्ष" चळवळीच्या कार्यकर्त्यांनी येरळा खो-याचा पायी प्रवास करून गोळा केलेली होती· येरळा खो-यातील हिंगणगाव बुद्रक, बेलवडे, सासपडे, सोहोली, शिवणी, अमरापूर, तोंडोली, वडियेरायबाग, हणमंतवडिये, भिकवडी, खेराडे, वांगी, तडसर, शिरगाव, रामापूर, कमळापूर, आंधळी इ·गावामध्ये प्रबोधनात्मक दिंडया काढून लोकांना बळीराजाच्या रूपाने हाती घेत असलेल्या कार्याची माहिती पटवून देण्यात येऊ लागली· खालील काही प्रतिकात्मक घोषणा या संदर्भात देता येतील·

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

xxx "प्रगती झाली कबूल, पण आपल्या वाटयाला काय ?"

xxx "तात्पुरत्या औषधांनी कसा तरी जीव टिकविणे पुरे झाले, रोग नाहीसा करणारे उपाय अंमलात आणू या!"

xxx "आपल्यावरील संकटे आपल्याला, विकासाचा मार्ग दाखवित आहेत."

xxx "राबणा-यांनो उठा, हा दुःखाचा डोंगर आपण भुईसपाट करू या.

xxx "संकटामुळे आम्ही लाचार बनणार नाही, हक्कांसाठी आम्ही लढणार आहोत."

xxx "लढाईच, पण केवळ आमच्या चार घासासाठी नव्हे".

xxx नवसाने होईना, वशिल्याने जमेना, लाचारीने तगेना, आता कष्टक-यांचे शास्त्र, स्वाभिमान, एकजूट हे शस्त्र घेऊन उठू या."

xxx "दुष्काळविरोधी चळवळ तीव्र करण्यासाठी व शेतीची बरबादी थांबविणारी चळवळ वाढविण्यासाठी आमची हाळी आहे."[20]

या प्रकारच्या घोषणा देवून लोकांच्या कर्तृत्वाला चालना दिली. राबणा-या जनतेत स्वकर्तृत्वाविषयी आत्मविश्वास निर्माण करून, शासनाचे लाचार न होता, लोकांच्यात स्वावलंबी आणि स्वाभिमानी वृत्ती निर्माण केली. लोककलांच्या माध्यमातून जनतेला चळवळीच्या कामी उभे करण्याचे प्रयत्न कार्यकर्त्यांनी केले. पथनाटय, भजन, ओव्या, गाणी याव्दारे लोकजागरण करण्यात आले. बलवडी-तांदुळवाडीतील स्त्री-पुरूष हातात टाळ, मृदंग, पेटी, ढोल, हालगी इ. पारंपरिक साहित्य घेऊन गावातल्या चौकात जमायचे आणि......

"जवा नवीन बळीराजा हा,
लागलाया पाणी आडवायला ।"

तसेच

"पहिल्या दिवशी आनंद झाला, बळीराजा हा जन्माला आला ।"
"आयाबायानों लवकर चला व कामाला लागा ।"

अशा करमणुकप्रधान कार्यक्रमातून बळीराजाचा लढा संघटित करण्यास सुरूवात केली. गावोगावचे लोक अशा दिंडयांकडे कुतुहलाने बघू लागले. कार्यकर्त्यांनी आपली जनजागरणाची

चिकाटी सोडली नाही. नंतर लोक विचार करू लागले. त्यातून आपल्याच प्रश्नाला या चळवळीने हात घातलेला आहे याची लोकांना जाणीव झाली. शासनाचे नाकर्तेपण परिसरातील लोकांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी या चळवळीला सहकार्याचा हात दिला. लोक या चळवळीत सामील झाले आणि येरळेच्या खो-यातील लोकमत बळीराजा धरण उभारणीच्या पाठिशी संघटित झाले.

बळीराजाच्या उभारणीतून वाळूचा लढा पुढे आला. बळीराजाच्या उभारणीतील महत्त्वाचे भांडवल म्हणजे वाळू. ही वाळू विकूनच बळीराजा धरणाचे बांधकाम पूरे करण्याचे नियोजन होते. सुरूवातील धरणासाठी वाळू विक्रीचे परवाने चळवळीला शासनाने दिले. परंतु नंतर शासनाने अडवणुकीचे धोरण स्वीकारले. धरण संघटनेला वाळू परवाना नाकारल्यामुळे भांडवलाअभावी धरणाचे पुढील काम थांबले. त्यामुळे बळीराजा धरणपूर्तीचा लढा हा कष्टक-यांच्या जीवनमरणाचा लढा झाला. नैसर्गिक साधन संपत्तीवर जनतेचा हक्क असला पाहिजे या न्याय हक्कासाठी येरळेत "वाळूचा लढा" सुरू झाला. मुंबईचे "आव्हान नाट्य मंच" आपल्या शेतकरी बांधवांच्या मदतीला धावून आले. त्यांनी येरळेच्या खो-यात लढयासाठी जनजागृतीचे कार्य सुरू केले. रात्र-रात्र जागवत "आव्हान नाट्यमंच" जनतेला आपल्या न्याय हक्कासाठी लढण्याचे, लढयात सामील होण्याचे आव्हान करू लागले....

"शिकणा-या भावारे
लिव्हणा-या भावारे
वाचणा-या भावारे
रडणा-या भावारे,
चल, उचल पेन, उचल घन,
माजलं रण, घडव मन"

या प्रकारे संपूर्ण खो-यात जागृती करून लढा उभारला. वृत्तपत्रांनी सामाजिक जाणीवेतून या लढयात कष्टक-यांची बाजू घेऊन आपल्या शस्त्राव्दारे शासनावर, त्यांच्या आडमुठया धोरणावर कडाडून हल्ला केला. विद्यार्थी, कष्टकरी खेडयापाडयात "बळीराजाची" कहाणी सांगू लागले. या भागातील कामगार मजूर संघटना, शे.का.पक्ष, जनता दल

यासारख्या विरोधी पक्षांनी या लढयात चळवळीला पाठिंबा दिला. त्यामुळे येरळा खो-यात सरकार विरूध्द कष्टकरी असे महायुध्द सुरू झाले. वृत्तपत्रांच्या सहकार्यामुळे हा लढा संपूर्ण राज्यात चर्चिला गेला. राज्यातून तसेच देशभरातून बळीराजाला वाढता पाठिंबा मिळू लागला. शासनाचे पितळ उघडे पडू लागले. लोकमताचा रेटा आणि लोकलढयाची तीव्रता यामुळे शेवटी शासनाला नमते घ्यावे लागले. शासनाने बळीराजासाठी संघटनेला वाळू विक्रीचा परवाना दिला आणि पुन्हा "बळीराजा" दिमाखाने आकार घेऊ लागला.[21]

बळीराजा धरण चळवळीने आपल्या न्याय हक्कासाठी शासकीय कार्यालयावर जसे मोर्चे नेले तसेच मोर्चे या दुष्काळी भागाचा विद्यापीठाने अभ्यास करावा यासाठी शिवाजी विद्यापीठावर नेले. ग्रामीण विकासासाठी उपयोगी येईल असे संशोधन विद्यापीठ झाले पाहिजे अशी मागणी करून दुष्काळ निर्मूलनाच्या कार्यात विद्यापीठाने उतरले पाहिजे अशी आग्रही भूमिका चळवळीने घेतली त्यामुळे शिवाजी विद्यापीठात 'खानापूर तालुका दुष्काळ निर्मूलन समिती' स्थापन केली. शिवाजी विद्यापीठ हे देशातील एकमेव विद्यापीठ ठरले की ज्यांनी दुष्काळ निर्मूलन संशोधन समितीची स्थापना केली.

तसेच विद्यापीठाने बळीराजाच्या उभारणीसाठी "राष्ट्रीय सेवा" योजना राबविली. विद्यापीठाला दुष्काळावर संशोधन करण्यास जसे चळवळीने भाग पाडले तसेच बळीराजाचा प्रस्ताव शासनाला सादर करून ठणकावून सांगितले की,

××× "आमची योजना वाचा, ती शास्त्रीय व वास्तव आहे असे आम्हाला वाटते. ही योजना चूक आहे हे सिध्द करा नाही तर तिची अंमलबजावणी करा."

××× "देणार नाही म्हणून चालणार नाही, का नाही हेही सांगा."

इ. घोषणांच्याव्दारे जनता, विद्यापीठ आणि शासकीय अधिकारी यांना जागे करून बळीराजाच्या उभारणीसाठी कामाला लावले.[22]

या प्रकारे बळीराजा चळवळीने धरण उभारणीचा प्रकल्प लोकजागृती करून, चळवळीचा प्रचार करून, बळीराजाला नैतिक अधिष्ठान प्राप्त केले. कष्टक-यांच्या चिवट झुंजीमुळे, कार्यकर्त्यांच्या योगदानामुळे आणि समाजातील वृत्तपत्रासारख्या इतर अनेक घटकांच्या

सहकार्यामुळे बळीराजा धरण चळवळ यशस्वी झाली· या लढयांच्या, धरणाच्या यशस्वीतेमुळे चळवळीचे काम दिवसेंदिवस व्यापक बनत चालले आहे· चळवळीचा दृष्टीकोण, तिचे पक्षातीत स्वरुप, तिचा शास्त्रीय पाया आणि तिची कार्यशक्ती यावर लोकांचा विश्वास बसला आहे· लोक स्वतः होऊन चळवळीच्या कामाला तयार होत आहेत· यामुळे चळवळीने आपल्या कार्याची व्याप्ती वाढविली आहे·

xxx संदर्भ xxx


1· कांबळे मधु "सरकारला शह देणारा सांगलीचा बळीराजा", "श्री" (साप्ता),मुंबई, दि·27 मे 1989, पृ·12

2· तत्रैव, पृ·12

3· तत्रैव, पृ·20

4· पाटणकर भारत व पवार संपतराव, "बळीराजा स्मृती धरण" माहितीपत्रिका, बलवडी-तांदुळवाडी, पृ·6

5· तत्रैव, पृ·6

6· संपादक, राष्ट्रसेवक क्रांती दल, "कहाणी बळीराजाची", पुणे, पृ·21

7· चौसाळकर अशोक, "म·फुले आणि शेतकरी चळवळ", प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय, मुंबई, नोव्हें·1990, पृ·33

8· तत्रैव, पृ·35

9· पाटणकर भारत यांच्या दि·11/12/93 रोजीच्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत·

10· *Thukral E.G. and Sakate M.D., 'Baliraja : A People's Alternative'; Big Dams : Displaced People. New Delhi 1992, Page 146*

11· गोफणे बी·एन·, "बळीराजा स्मृती धरण", संशोधन प्रकल्प लोकसंख्या शिक्षण मंडळ, वेणूताई चव्हाण कॉलेज कराड, 1990, पृ·18

12· गुरव धनाजी यांच्या दि·11/12/93 रोजीच्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत

13· फडणीस जगन "बळीचे राज्य येवो" दै·पुढारी कोल्हापूर, 14 नोव्हेंबर 1993,पृ·10

14· गोफणे बी·एन·, उ·नि·पृ·19

15· पाटणकर भारत व पवार संपतराव, "बळीराजा स्मृती धरण" माहिती पुस्तिका,पृ·6

16· पाटणकर भारत यांच्या दि·11/12/93 च्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत

17· उ·नि·मुलाखतीवरून उद्धृत·


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

18· पाटणकर भारत, "पर्यायी विकासनीती", समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, 1991, पुस्तक दुसरे, पृ·31

19· गोफणे बी·एन·, उ·नि·, पृ·21 व 22

20· मुक्ती संघर्ष चळवळ, "आसूड", विटा, 1985, पृ·32

21· कांबळे मधु, उ·नि·पृ·20

22· गोफणे बी·एन·, उ·नि·पृ·23